**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**औरंगाबाद कृषी हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक ०५.०२.२०२१**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०६ ते ०९ फेब्रुवारी २०२१ ) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ |
| पाऊस | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | २९ | २९ | २८ | २९ | ३० |
| किमान तापमान (अं.से.) | ११ | १० | ११ | १२ | १३ |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५४ | ५० | ४९ | ५० | ५५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३५ | ३९ | ३५ | २४ | २२ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १५ | ११ | ८ | ६ | ६ |
| वा-याची दिशा | ईशान्य | ईशान्य | पूर्व | ईशान्य | पूर्व |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानूसार जिल्हयात पुढील दिवस आकाश स्वच्छ राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| हरभरा | घाटे वाढीची अवस्था | पक्ष्यांपासून ज्वारी पिकाच्या कणसांचे संरक्षण करण्यासाठी (उदा. रिळ लावणे, आवाज करणारी पंख्यासारखी स्वयंचलित यंत्रे बसविणे, बुजगावणे उभे करणे इत्यादी) उपाययोजना कराव्यात. |
| करडई | फुलधारणा | करडई पीकावरील पाने खाणा-या अळीच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ऊस | लागवड | सुरु ऊसाची लागवड १५ फेब्रूवारी पर्यंत पूर्ण करावी.लागवडीसाठी जातिवंत बेण्याची निवड करावी. बेण्याचे वय १० ते ११ महिन्यांचे असावे.जमिनीची चांगली मशागत करून पट्टा पद्धतीने लागवडीचे नियोजन करावे. |
| रब्बी ज्वारी | फुलोरा ते दाणे भरणे अवस्था | पक्ष्यांपासून ज्वारी पिकाच्या कणसांचे संरक्षण करण्यासाठी (उदा. रिळ लावणे, आवाज करणारी पंख्यासारखी स्वयंचलित यंत्रे बसविणे, बुजगावणे उभे करणे इत्यादी) उपाययोजना कराव्यात. |
| मका (रब्बी) | कणसे धरणे व दाणे भरणे अवस्था | मका पिकावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी थायमिथॉक्झाम १२.६ टक्के + लॅमडा सायहॅलोथ्रीन ९.५ टक्के झेडसी प्रति ५ मिली किंवा क्लोरॅंट्रीनिलीप्रोल १८.५ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | पोटरी ते ओंब्या धरणे अवस्था | गहू पिकामधील खोडकिडयाच्या व्यवस्थापनासाठी प्रादूर्भावग्रस्त झाडे उपटून टाकावीत तसेच सायपरमेथ्रीन १० ईसी ११ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गहू पिकावरील माव्याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० ईसी २०० मिली प्रती एकर फवारणी करावी. |
| पेरु | काढणी अवस्था | पेरु फळबागेतील फळमाशीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी १० मिथाईल युजेनॉल सापळे लावावेत तसेच किडबाधीत गळालेली फळे नष्ट करावीत. |

| | | |
|---|---|---|
| आंबा | फुलोरा अवस्था | आंब्याची गुणवत्ता व उत्पन्न वाढविण्यासाठी फुलोरा अवस्थेत अर्कामँगो स्पेशिअल (सुक्ष्मअन्नद्रव्य) ची ५० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी गंधक २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजीपाला | फुलधारणा ते फळधारणा अवस्था | वांगी पिकावरील शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव ओळखण्याकरीता हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. तसेच वांगी पिकावरील शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एससी४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| चारा पिके | जमिनीची निवड | पाण्याची उपलब्धता असल्यास उन्हाळी हंगामात चारा पिकांच्या लागवडीसाठी पूर्वमशागतीची कामे करावीत. ज्वारीसाठी मध्यम, तर मका व बाजरी या चारा पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी. |
| कृषि अभियांत्रिकी | | सदयस्थितीत औरंगाबाद जिल्हयातील बाजारपेठेत पपईची आवक चांगली आहे. तसेच पपई ही आरोग्यास पोषक असुन पपईपासुन जाम, जेली, केक, टुटी फ्रुटी, सरबत, मार्मालेड, पेपेन इत्यादी मुल्यवर्धीत पदार्थ तयार करता येतात. |
| इतर | | ऊस पिकातील सऱ्यामध्ये सेंद्रिय आच्छादनाचा वापर केल्यास बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन पिकास कमी पाणी लागते. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**